महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, चौथा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

---

क्रमांक: एनआरडी-३३२०/सं.क्र १२७६/नवि-७ md961 दिनांक: २२ जानेवारी, २०२१.

ना.म.प्र.वि.प्रा. आ.क्र. विभाग AC दिनांक 179072 23-02-2021 महा.आयुक्त

प्रति,

महानगर आयुक्त
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
विभागीय आयुक्त कार्यालय,
नागपूर

विषय : नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण दि १७.१२.२०२० रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता मिळणेबाबत

संदर्भ : आपले पत्र क्र नामप्रविप्रा./प्रा.बै/४९३५, दि. १८.१२.२०२०

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, 3 3/3/2021

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विषयाकिंत पत्रान्वये सादर केलेल्या, मा. मुख्यमंत्री महोदय तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी दि. १७.१२.२०२० रोजी वर्षा शासकी निवासस्थान, मलबार हिल, मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तावर मा. मुख्यमंत्री महोदयाची स्वाक्षरी झाली असून स्वाक्षरी केलेल्या बैठकीच्या इतिवृत्ताची मुळ प्रत पुढील कार्यवाहीस्तव सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

अनुपालन सादर करा

आपला,

(प्र. म. पाटील)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत: वरीलप्रमाणे

A.E-I

AC (M) No 244 Dt 02/3/21

\\Omb04udd044\c\AsstUDDUD71214\Gaurav Koli\letter-3.doc

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या गुरूवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२० रोजी संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ६ व्या बैठकीचे इतिवृत्त

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे अध्यक्षतेखाली दि. १७ डिसेंबर, २०२० रोजी दुपारी ४:३० वाजता 'वर्षा' शासकीय निवासस्थान, मलबार हिल, मुंबई येथे प्राधिकरणाची ६ वी बैठक संपन्न झाली. या बैठकीस खालील पदाधिकारी/अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अध्यक्ष/सदस्य/अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | **मा. ना. श्री. उध्दव ठाकरे** | मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. |
| २ | **मा. ना. श्री. एकनाथ शिंदे** | मा. मंत्री, नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य तथा सदस्य, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ३ | **मा. ना. डॉ. नितीन राऊत** | मा. मंत्री, ऊर्जा, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपूर जिल्हा व सदस्य, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ४ | **मा. श्री. संजयकुमार, भाप्रसे** | मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा सदस्य, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ५ | **मा. श्री. भूषण गगराणी, भाप्रसे** | मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग–१ महाराष्ट्र राज्य तथा सदस्य, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ६ | **मा. श्री. एस.व्ही. आर. श्रीनिवास, भाप्रसे** | मा. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र राज्य तथा सदस्य, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ७ | **श्रीमती शीतल तेली–उगले, भाप्रसे** | महानगर आयुक्त, तथा सदस्य सचिव, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ८ | **मा. श्री. राधाकृष्णन बी भाप्रसे** | आयुक्त, महानगरपालिका, नागपूर तथा सदस्य, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ९ | **श्री. हेमंतकुमार पवार** | अपर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| १० | **मा. श्रीमती मनिषा कोठे** | मा. महापौर तर्फे कार्यकारी महापौर, महानगरपालिका, नागपूर तथा सदस्य, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (व्ही. सी. व्दारे) |

| | | |
|---|---|---|
| ११ | मा. श्री. विजय झलके | मा. अध्यक्ष, स्थायी समिती, महानगरपालिका, नागपूर तथा सदस्य, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (व्ही. सी. व्दारे) |
| १२ | मा. डॉ. संजीव कुमार, भाप्रसे | मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग तथा सदस्य, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (व्ही. सी. व्दारे) |
| १३ | मा. श्री. सुनिल बी. फुलारी | मा. पोलीस आयुक्त तर्फे अतिरिक्त पोलीस आयुक्त, नागपूर तथा सदस्य, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (व्ही. सी. व्दारे) |

**सर्वप्रथम मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे व इतर सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे महानगर आयुक्त तथा सदस्य सचिव, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी स्वागत करून मा. अध्यक्ष यांचे अनुमतीने बैठकीला सुरूवात करण्यात आली.**

| अ. क्र. | ठराव क्रमांक | विषय | ठराव / निर्णय | अंमलबजावणी करणारा विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | ०१/०६/१७.१२.२०२० | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या गुरूवार, दिनांक ०४ जुलै, २०१९ रोजी संपन्न झालेल्या पाचव्या बैठकीतील निर्णय तथा सुचनांचा अनुपालन अहवाल. | विषय क्र. १ यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| २ | ०२/०६/१७.१२.२०२० | महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ च्या कलम २८ अन्वये नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सन २०१९–२० च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सन २०२०–२१ च्या अनुमानित अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करणे तसेच दि. १ एप्रिल, २०२० ते १६ डिसेंबर, २०२० या दरम्यान झालेल्या प्रत्यक्ष खर्चाला प्राधिकरणाची कार्योत्तर मंजूरी मिळण्याबाबत. | विषय मान्य करण्यात आला.<br><br>सादरीकरणा दरम्यान नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा अंतर्गत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याकरीता उर्वरित निधीची आवश्यकता आहे, असे महानगर आयुक्त यांनी नमूद केले असता मा. पालकमंत्री महोदयांनी प्रकल्प निहाय किती निधी आवश्यक आहे अशी विचारणा केली. त्यावेळी खालीलप्रमाणे माहिती सादर करण्यात आली. | १. सामाजिक न्याय विभाग,<br>२. नियोजन विभाग,<br>३. गृहनिर्माण विभाग व म्हाडा,<br>४. नगर विकास विभाग,<br>५. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ |



५१५

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr><th>प्रकल्प</th><th>अप्राप्त निधी (रू. कोटी)</th></tr>
<tr><td>मोठा ताजबाग विकास</td><td>रू. ३२.०८</td></tr>
<tr><td>महालक्ष्मी जगदंबा संस्थान</td><td>रू. २२.२५</td></tr>
<tr><td>डॉ.आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर, इंदोरा</td><td>रू. २६.५९</td></tr>
<tr><td>शांतीवन चिचोली प्रकल्प</td><td>रू. ७.७६</td></tr>
<tr><td>प्रधानमंत्री आवास योजना घटक–३ प्रकल्प</td><td>रू. ८.७०</td></tr>
<tr><td>लकडगंज पोलीस वसाहत</td><td>रू. १४.००</td></tr>
<tr><td>दिक्षाभूमी विकास</td><td>रू. ६०.००</td></tr>
<tr><td>डॉ.आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर (प्रस्तावित)</td><td>रू. १४.९४</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>रू. १८६.३२</td></tr>
</table>
वरीलप्रमाणे रू. १८६.३२ कोटी एवढा निधी संबंधीत विभागांनी तातडीने उपलब्ध करून द्यावा, असे मा. अध्यक्ष महोदयांनी निर्देश दिले.
</td>
<td></td>
</tr>
<tr>
<td>३</td>
<td>०३/०६/१७.१२.२०२०</td>
<td>नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जमिन विल्हेवाट विनियम (Land Disposal Regulation), २०१९ यास मान्यता प्राप्त झाल्याबाबत.</td>
<td>विषय मान्य करण्यात आला.</td>
<td>नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण</td>
</tr>
</table>



८/५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ०४/०६/१७.१२.२०२० | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्राअंतर्गत वेळोवेळी प्राधिकरणास प्राप्त होणाऱ्या शासकीय निधीतून करावयाची विकास कामे एकूण प्रकल्प खर्चाच्या १० टक्के अभिकरण शुल्क (**PMC Charges** सह) आकारून आणि खाजगी मंजूर अभिन्यासातील विकास कामे एकूण प्रकल्प खर्चाच्या १० टक्के अभिकरण शुल्क आकारून महानगर विकास प्राधिकरणाव्दारे अभिकरण तत्वावर (**Agency basis**) विकास कामे करण्यासाठी मान्यता मिळण्याबाबत. | विषय मान्य करण्यात आला. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ५ | ०५/०६/१७.१२.२०२० | प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांकरीता (EWS) मंजूर असलेल्या प्रकल्पांवरील आवश्यकतेनुसार नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीतून खर्च करण्याकरीता खर्चाची मर्यादा काढून टाकणे व लाभार्थ्यांकडून तसेच शासन हिस्स्याच्या प्राप्त निधीतून समायोजन करण्याकरीता महानगर आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्याबाबत. | सुधारणेसह विषय मान्य करण्यात आला. स्वनिधीतून खर्च करण्याची मर्यादा रू. १०० कोटी वरून वाढवून रू. २०० कोटी करण्यात आली. शासन निधी व लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेली रक्कम विचारात घेवून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधीतून खर्च करण्यात आलेली रक्कम समायोजित करण्यात यावी, असे मा. अध्यक्ष महोदयांनी निर्देश दिले. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

<table>
<tr><td>६</td><td>०६/०६/१७.१२.२०२०</td><td>महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये महानगर क्षेत्रातील मंजूर विकास योजने मधील ई.पी. १२१ मध्ये दुरूस्ती करणेकरीता कलम ३७(१) अन्वये शासनाने दि. १३.०९.२०१९ रोजी दिलेले निदेश.</td><td>सुधारणेसह विषय मान्य करण्यात आला.<br>प्राधिकरणात झालेल्या ठरावानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये कलम २६(१) नुसार प्रसिध्द केलेल्या प्रारूप विकास योजनेमधील खालीलप्रमाणे आरक्षणे कायम करण्यास महानगर आयुक्त यांनी शासनास प्रस्ताव सादर करावा, असे मा. अध्यक्ष महोदयांनी निर्देश दिले.
<table>
<tr><th>अ. क्र</th><th>सर्व्हे क्र</th><th>मौजा</th><th>आरक्षण</th></tr>
<tr><td>१</td><td>७८</td><td>कापसी (बु)</td><td>East A – EC02002</td></tr>
<tr><td>२</td><td>७९/१</td><td>कापसी (बु)</td><td>East A – EC01008</td></tr>
<tr><td>३</td><td>७९/२</td><td>कापसी (बु)</td><td>East A – EC02002</td></tr>
</table></td><td>१. नगर विकास विभाग (१),<br>२. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण</td></tr>
<tr><td>७</td><td>०७/०६/१७.१२.२०२०</td><td>नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा अंतर्गत खाजगी जमिनीवरील अभिन्यास मंजूरी करीता आकारण्यात येणाऱ्या दरांमध्ये सुधारणा करण्याबाबत.</td><td>विषय मान्य करण्यात आला.</td><td>नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण</td></tr>
<tr><td>८</td><td>०८/०६/१७.१२.२०२०</td><td>नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत क्षेत्रात नोंदविल्या जाणाऱ्या दस्तांसाठी जिल्हा परिषदेला प्राप्त होणाऱ्या १ टक्के अतिरिक्त मुद्रांक शुल्कापैकी २५ टक्के रक्कम नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास मिळण्याबाबत.</td><td>विषय मान्य करण्यात आला.<br>प्राधिकरणाच्या ठरावानुसार नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी नगर विकास विभाग (१) यांना प्रस्ताव सादर करावा. नगर विकास विभागाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत क्षेत्रात नोंदविल्या जाणाऱ्या दस्तांसाठी जिल्हा परिषदेस प्राप्त होणाऱ्या</td><td>१. नगर विकास विभाग (१)<br>२. ग्राम विकास विभाग<br>३. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण</td></tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | १टक्के अतिरिक्त मुद्रांक शुल्कापैकी २५ टक्के रक्कम नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास उपलब्ध करून देण्याबाबत ग्राम विकास विभागाकडून शासन निर्णय निर्गमित होण्यासाठी प्रस्ताव पाठवावा, असे मा. अध्यक्ष महोदयांनी निर्देश दिले. | |

## वेळेवर येणारे विषय

| | ठराव क्रमांक | विषय | ठराव /निर्णय | अंमलबजावणी करणारा विभाग |
|---|---|---|---|---|
| ९ | ०९/६/१७.१२.२०२० | फुटाळा तलाव येथे संगीत कारंजे, लाईट साऊंड व लेझर मल्टीमिडिया शो तसेच अंबाझरी उद्यान येथे स्वामी विवेकानंद यांचे जीवनावर आधारित लाईट, साऊंड व लेझर मल्टीमिडीया शो उभारण्याबाबत. | विषय मान्य करण्यात आला. | १. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण<br>२. नागपूर सुधार प्रन्यास |
| १० | १०/६/१७.१२.२०२० | प्रकल्प व परियोजनांच्या निविदांच्या कंत्राट राशीत वाढ किंवा बचतीला मान्यता प्रदान करण्याचे अधिकार सोपविण्याबाबत. | विषय मान्य करण्यात आला. | १. कार्यकारी समिती,<br>२. मा.अध्यक्ष,कार्यकारी समिती,<br>३. महानगर आयुक्त, नामप्रविप्रा |



१३/५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | ११/६/१७.१२.२०२० | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जमिन विल्हेवाट विनियम (Land Disposal Regulation), २०१९ मध्ये बांधीव क्षेत्राच्या मिळकतीच्या विनियोगासाठी नविन तरतूद अंतर्भूत करणे. | विषय मान्य करण्यात आला. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि सर्व उपस्थित मान्यवरांचे महानगर आयुक्त तथा सदस्य सचिव, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी आभार मानले व मा.अध्यक्ष यांचे अनुमतीने बैठक संपन्न झाल्याचे घोषित करण्यात आले.

18.12.2020

(उध्दव ठाकरे)
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,

(शीतल तेली–उगले)
महानगर आयुक्त तथा सदस्य सचिव,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण



९५५